# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर



## छत्रपति राजाराम

प्रा. श. श्री. पुराणिक

# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर

(१६८१-१७०७)

उत्तरार्ध

## छत्रपति राजाराम व ताराबाई

(१६८९-१७०७)

लेखक

प्रा. श. श्री. पुराणिक

काळ प्रकाशन, पुणे ३०

प्रथमावृत्ति १९८२, डिसेंबर
मूल्य ५० रुपये

मुद्रक : प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन, १८३५, सदाशिव पेठ, पुणे ३०.

श्री. शंकर रामचंद्र

तथा

मामाराव दाते

यांस

## प्रस्तावना

गेल्या वर्षी म्हणजे दि. ११ जून १९८१ रोजी 'मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचा 'पूर्वार्ध' प्रसिद्ध झाला. आज 'उत्तरार्ध' प्रसिद्ध होत आहे; आणि हे दोन्ही खंड मिळून हा विषय आता पूर्ण झालेला आहे हे सांगण्यास मला समाधान वाटत आहे. एवढे मोठे काम माझ्या हातून अखेर सिद्धीस गेले याबद्दल तर मला धन्यता वाटतेच. पण त्याहीपेक्षा 'उत्कट भव्य तेचि घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे ।' या समर्थांच्या वचनानुसार मराठ्यांच्या इतिहासातील या उत्कट आणि भव्य पर्वाच्या सेवेत देवाच्या पूजेत सहाणेवर झिजणाऱ्या चंदनाप्रमाणे माझी विद्या आणि लेखणी झिजली, याबद्दल वाटणारी कृतार्थता व्यक्त करण्यास माझ्यापाशी शब्द नाहीत.

'संजीवनी' मंत्राच्या प्रभावाने मेलेले वीर जिवंत होत अशी कथा आहे. इतिहासातली सहानुभूति Sympathetic Imagination हाही असाच एक अमोघ आणि अद्भुत 'संजीवनी' मंत्र आहे. त्या मंत्राच्या प्रयोगाने आणि अनुष्ठानाने मराठ्यांच्या इतिहासातली ती तीनशे वर्षांपूर्वीची माणसं पुन्हा जिवंत झाली आणि माझ्याभोवती वावरू लागली; आणि त्यांनी संचार केलेली ती स्थळ आणि त्यांचा तो काळ चित्रात रेखल्यासारखा माझ्या डोळ्यांपुढे उभा राहिला. मुलाच्या व राज्याच्या चिंतेने खंगलेले आणि शेवटी निर्धाराने सर्व ऐहिक व्यापारांचा संन्यास करून श्रीचे स्मरण करीत अखेरच्या घटका मोजणारे मृत्युशय्येवरचे शिवछत्रपति, रायगडपासून फोंड्यापर्यंत वादळवाऱ्याप्रमाणे घोंघावत गेलेला वीरमणि संभाजी, जिवंतपणी चितेवर चढावे त्याप्रमाणे औरंगजेबाच्या दरबारात प्रवेश करणारी सती येसूबाई, भीमेपासून तुंगभद्रेपर्यंत आणि साताऱ्यापासून जिंजीपर्यंत झंझावाताप्रमाणे झेपावत जाणारा आणि पारध्यांनी गरुड टिपावा त्याप्रमाणे मारेकऱ्यांनी कारखळगाच्या जंगलात अचूक 'टिपलेला' दुर्दैवी संताजी, कोल्हापूरच्या महिषासुरमर्दिनीप्रमाणेच मोगलांचे निर्दालन करणारी ती भद्रकाली ताराबाई, वार्धक्याने, व्याधींनी आणि मराठ्यांच्या हल्ल्यांनी, बाणांच्या वर्षावात विव्हळ झालेल्या भीष्माप्रमाणे जर्जर झालेला तरीही अखेरपर्यंत झुंजणारा ताठ कण्याचा दुर्दम्य औरंगजेब, भीमेच्या खळाळणाऱ्या प्रवाहाला खेटून उभे असलेले त्याचे ते बेगमपूर, विराट् वैभवाचा तो उद्ध्वस्त अवशेष, तेथले ते गुडघा गुडघा उंच वाढलेले गवत, तो पडका निमजगा, त्या वेळच्या पाच मैल लांबीच्या तटबंदीचे आता उरलेले ते एकाकी आणि केविलवाणे खिंडार. ब्रह्मणपूरच्या राजवाड्यातील हमामखान्याच्या छतावरचे ते संगमरवरी नक्षीकाम वाही बागेतल्या हिरवळीचा तो मखमली गालीचा, पडझड झालेल्या इमारतींनी

खचलेले ते विजापूर, आणि तेथल्या 'मुलुखमैदान' तोफेवरचा औरंगजेबाचा तो 'शिलालेख', वैराग्याच्या ऐश्वर्याने झगमगणारी खुल्दाबादची ती औरंगजेबाची कबर.... हिलालींनी आणि मशालींनी उजळलेली तीन शतकांपूर्वीची इतिहासातल्या पात्रांची आणि स्थळांची तो विलक्षण मिरवणूक, समुद्राच्या लाटांप्रमाणे गंभीर घोष करीत इतकी वर्षे डोळ्यांपुढून मिरवत जात होती. ती मिरवणूक आता संपलेली आहे आणि तो कोलाहलही आता शांत झालेला आहे. समारंभासाठी गजबजलेले घर रिकामे झाले म्हणजे जसे खायला उठते तसे आता झाले आहे.

टिळकांची अशी गोष्ट सांगतात की, गणेशोत्सवात गणेशमूर्तीचे विसर्जन करून आल्यानंतर ते काही वेळ अगदी खिन्न होऊन एकटेच बसत. धर्मानंद कोसंबींनी त्यांना एकदा याबद्दल विचारले. तेव्हा ते म्हणाले– "गणपतीचे विसर्जन करून मी आलो म्हणजे मला नेहमीच असे उदास वाटते." टिळकांसारख्या ज्ञानी माणसालामुद्धा अशी उदासीनता यावी याचे कोसंबींना आश्चर्य वाटले. तेव्हा टिळकांनी त्यांना ज उत्तर दिले त्याचा आशय असा होता की, ज्ञानी माणूस हा ज्ञानी असला तरी अखेर माणूसच असतो. टिळकांची ही भावना टिळकांसारख्या ज्ञानी नसलेल्या आपणासारख्या सामान्य माणसांनासुद्धा सहज समजण्यासारखी आहे. कारण, दहा दिवस जो उत्सव आपण आनंदाने साजरा केला, तो उत्सव, ती पूजा, ती आरती आणि ती आरास आता संपली, ही भावनाच विसर्जनाच्या वेळी माणसाच्या मनाला विलक्षण व्याकूळ करणारी आहे याची साक्ष कोणीही देऊ शकेल. नऊ वर्षांपूर्वी मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमराच्या मूर्तीची मी प्राण-प्रतिष्ठा केली, तिचे आज विसर्जन करताना माझीही भावना हीच आहे की, विसर्जन जरी यथासांग होत असले तरी उत्सवाचा आनंद यापुढे संपलेला आहे.

गिबनने आपल्या इतिहासात स्पेनचा खलिफा अब्दुल रहिमान याची एक कथा दिलेली आहे. या अब्दुल रहिमानने पन्नास वर्षे एकछत्री राज्य केले, त्याच्या घरी ऐश्वर्य माहेराला आलेले होते, त्याचे शत्रु त्याला थरथर कापत होते. त्याचे मित्र त्याच्यावर प्रेम करीत होते. त्याची प्रजा त्याला भजत होती. त्याचा जनानखाना मोठा होता व त्याची मुले आज्ञाधारक होती. देवाने माणसाला यापेक्षा जास्त काय बरे द्यावे ? पण असा हा भाग्यशाली अब्दुल रहिमान मेला, तेव्हा त्याच्या कपाटात त्याच्या हातचा एक लेख सापडला. त्यात त्याने म्हटले होते की, "सर्व सुखे पन्नास वर्षे माझ्यापुढे हात जोडून उभी होती. अशा स्थितीत निर्भेळ आनंदाचे दिवस मला किती मिळाले हे मी एकदा मोजून पाहिले. ते पन्नास वर्षांत फक्त चौदा भरले !" ही गोष्ट देऊन गिबनने एक तळटीप जोडलेली आहे. तीत तो म्हणतो – "मदृयाबद्दल जर बोलायचे झाले– आणि फक्त माझ्याबद्दलच मला अधिकाराने बोलता येईल – तर माझ्या आयुष्यातले आनंदाचे दिवस स्पेनच्या खलिफाच्या वाट्याला आलेल्या तुटपुंज्या दिवसांपेक्षा पूर्वीही

जास्त होते आणि आताही जास्तच आहेत; आणि त्यातले बरेचसे या ग्रंथरचनेच्या आनंद देणाऱ्या कष्टामुळे माझ्या वाट्याला आलेले आहेत.

"My happy hours far exceeded and far exceed the scanty numbers of the Caliph of Spain; and many of them are due to the pleasing labour of the present composition."

१७६५ च्या १५ ऑक्टोबर या दिवशी सूर्यास्ताच्या सोनेरी किरणांनी झळाळलेले रोमच्या वैभवाचे छिन्नविच्छिन्न अवशेष पाहत असताना त्या शहराचा इतिहास लिहिण्याची कल्पना गिबनच्या मनात प्रथम स्फुरली आणि चोवीस वर्षे अखंड उद्योग करून १७८९ च्या जून महिन्यात, सहा खंड पूर्ण करून, त्याने ती अखेर शेवटास नेली. चांदण्याच्या चाऱ्यावर जगणाऱ्या चकोराप्रमाणे त्या कल्पनेचे स्फुरण झाले त्या क्षणापासून अंतरंगात उजळलेल्या प्रतिभेच्या अपार्थिव चांदण्याच्या नाजूक आणि प्रसन्न प्रकाशात, आज काळाच्या लीलाकैवल्याने स्मृतिशेष झालेली ती दीड हजार वर्षांपूर्वीची रोमची रम्य नगरी, ते महान् नृपति, ते सामन्तचक्र, ती विद्वज्जन परिषद, त्या चंद्रमळी, ते मदोन्मत्त राजपुत्र, ते भाट आणि त्या कथा यांनी गजबजलेला इतिहासाचा तो अफाट आणि स्तिमित करणारा चित्रपट पाहण्यात आणि सांगण्यात गिबन इतका रंगून गेला की, पेटलेल्या कापराप्रमाणे त्याच्या जीवनाची चोवीस वर्षे पाहता पाहता कशी उडून गेली ते त्याचे त्यालाही कळले नाही. आणि जेव्हा ते देवांचे चांदणे हळूहळू ओसरले आणि हलकेच मावळले, आणि तो चित्रपट अकस्मात् संपला, तेव्हा सुरम्य स्वप्न भंगावे तशी गिबनची ती निरतिशय आनंदाची समाधि खाडकन् उतरली. तो दचकून भानावर आला आणि त्याला कमालीची हळहळ वाटली. तो प्रसंग त्याने स्वतःच वर्णन केलेला आहे की– 'त्या वेळी मध्यरात्र झालेली होती. शेवटच्या खंडाच्या शेवटच्या प्रकरणाच्या शेवटच्या ओळी मी लिहिल्या आणि लेखणी खाली ठेवली आणि बागेत थोड्या फेऱ्या मारल्या. त्या वेळी सारी सृष्टि शांत होती; आणि चंद्राची सोनेरी कोर तलावाच्या पाण्यात चमकत होती. हाती घेतलेले काम मी शेवटास नेले याबद्दल मला आनंद वाटला आणि कदाचित माझी कीर्ति आता कायम झाली म्हणून मला समाधानही झाले. पण लौकरच या कृतार्थतेची जागा विषादाने घेतली. मला असे वाटले की आज मी माझ्या एका जुन्या आणि गोड मित्राचा कायमचा निरोप घेतलेला आहे.

'A sober melancholy was spread over my mind by the idea that I had taken an ever lasting leave of an old and agreeable companion."

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमराची आज सांगता झालेली आहे आणि तो इतिहासातली आनंदयात्रा आता संपलेली आहे. या प्रसंगी माझ्याही भावना गिबनपेक्षा

वेगळ्या आहेत असे नाही. अर्थात्, गिबन हा फारच मोठा माणूस हे खरेच आहे पण लहान काय किंवा मोठ्या काय, लेखकाची सुखदुःखे सगळीकडे सारखीच असतात. म्हणून माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी गिबनचा दृष्टान्त मी दिला इतकेच.

परंतु, ज्या अनिर्वचनीय आनंदाचा आस्वाद मी इतकी वर्षे घेतला, त्या आनंदात या ग्रंथाच्या द्वारे माझ्या वाचकांनाही मी वाटेकरी करू शकलो, या जाणिवेमुळे अंधाराला प्रकाशाचा मोहोर यावा, त्याप्रमाणे या दुःखातही सुख आहे आणि या विषादातही समाधान आहे. हे तर कलावंताचे मोठे भाग्य आहे की, त्याची कला एकाच वेळी स्वार्थी असते आणि परार्थीही असते, आत्मनिष्ठ असते आणि परनिष्ठही असते, स्वतःसाठी असते आणि दुसऱ्यांसाठीही असते. त्याला देवाने दिलेले आनंदाचे भांडार दामाजीपंताने लुटविलेल्या धान्याच्या कोठाराप्रमाणे इतरांकडून लुटविण्यासाठीच असते, स्वतःकरिता राखण्यासाठी नव्हे. 'रघुवंशा'त वर्णन केलेल्या रघुराजाप्रमाणे कलावंताचाही 'आदानं हि विसर्गाय' असा आनंदाचा 'सर्वस्व-दक्षिण' यज्ञ असतो. कारण आनंद घ्यावा आणि आनंद द्यावा हेच कलेचे अंतिम कार्य आहे. एका थोर कलाकोविदाच्या यथार्थ नावाचा पुनरुच्चार करावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, सर्व कलांचा चरम उद्देश 'आनन्दवर्धन' हाच आहे. इतिहासाची कलाही त्याला अपवाद नाही. म्हणून मला लाभलेल्या आनंदाचा शतांश जरी या ग्रंथांच्या द्वारे माझ्या वाचकांपर्यंत मी पोचवू शकलो, तरी मी स्वतःस धन्य समजेन.

हा 'उत्तरार्ध' मी श्री. शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते यांस अर्पण करीत आहे. मामांची देशभक्ति आणि स्वार्थत्याग, त्यांचे चारित्र्य आणि विद्वेची अभिरुचि, त्यांची मराठ्यांच्या इतिहासाची आस्था आणि त्यांनी या ग्रंथासाठी प्रारंभापासून अखेरपर्यंत घेतलेले कष्ट या सर्व गुणसंपदेचा गौरव या समर्पणात मला अभिप्रेत आहे. मामांच्या या गौरवात या ग्रंथासाठी परिश्रम केलेल्या त्यांच्या मुद्रणसंस्थेच्या कार्यकर्त्यांचाही गौरव अर्थात् समाविष्ट आहेच. मामांचा हा गुण-गौरव सर्वस्वी पक्षनिरपेक्ष आहे, हे मुद्दाम सांगितले पाहिजे असे नाही.

कारण असे की, हिंदुमहासभा, कॉंग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट इत्यादि विविध पक्ष महाराष्ट्रात असले, तरी महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान, निदान त्याच्याबद्दल आत्मीयता हा या सर्वच पक्षांचा समान गुणविशेष आहे. त्या इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आणि मूल्यमापन याबद्दल त्यांचा एकमेकांशी मतभेद होणे हे अगदी शक्य आहे. पण या मतभेदामुळे महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दलची त्यांची जी आत्मीयता आहे, त्या आत्मीयतेला आणि एकात्मतेला पक्षांच्या विविधतेमुळे बाध येत नाही. उदाहरणार्थ, काकासाहेब गाडगीळ यांच्या सोमनाथावरील 'एक हजार वर्षांनंतर' या सुंदर लेखातील पुढील अवतरण पाहिले

म्हणजे हिंदुत्वाचा अभिमान आणि मराठ्यांच्या ऐतिहासिक परंपरेचा उज्ज्व
वारसा इतक्या वर्षांनंतरही आजच्या मराठी माणसांच्या मनापर्यंत कसा येऊ
पोचतो याची उत्तम कल्पना येईल–"आता मूर्ति दिसेल म्हणून पुढच्या गाभाऱ्या
आलो व तेथील दृश्य पाहताच मन व शरीर बधिर झाल्यासारखे झाले. शिख
मोडून टाकल्यामुळे वर मोकळे होते. वर निळे आकाश हेच छत्र होते. मूर्तीच्य
जागेत खड्डा होता, मूर्ति नव्हती! तोच समोरील भिंतीवर मोठ्या अक्षरा
'महाराष्ट्र' हा शब्द लिहिलेला पाहिला. त्याची जादू ज्याची मातृभाषा मराठ
आहे तोच जाणू शकतो. अटकेपार हिंदवी स्वराज्य नेणाऱ्यांचा मी वंशज, हे भग
मंदिर, हे मूर्तिहीन देवालय कसे पाहू? कसे साहू? अंगावर रोमांच उभे राहिले.'

त्याचप्रमाणे काकासाहेब पंजाबचे राज्यपाल असताना त्यांच्याच प्रेरणेने १९६
साली पानिपतच्या दोनशेव्या पुण्यतिथीनिमित्त चंडीगड विद्यापीठाने 'Maratha and Panipat' हा संस्मरणीय स्मारक ग्रंथ प्रसिद्ध केला, हे सांगण्यासारखे आहे
तसेच 'अष्टग्रहोतील नववा' या त्यांच्या पुस्तकातले 'पुन्हा एकदा पानिपत' व
'शीखांच्या दृष्टिकोनातून पानिपत' हे लेख त्यांच्या मराठी इतिहासाबद्दलच्य
अभिरुचीची साक्ष देणारे आहेत. साहित्य अकादमीने प्रसिद्ध केलेल्या 'राजवाडे
लेखसंग्रहा'ला आणि सुठणकरांच्या 'राघोभरारी'ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
यांनी लिहिलेल्या प्रस्तावना मराठ्यांच्या इतिहासाकडे मूलगामी आणि चिकित्सक
दृष्टीने पाहणाऱ्या त्यांच्या बुद्धिवादी प्रतिभेची उत्तम उदाहरणे म्हणता येतील
यशवंतराव चव्हाण हे संरक्षणमंत्री असताना पानिपतच्या मैदानावरून एकदा
त्यांची मोटार जात होती, तेव्हा त्यांनी मोटार थांबविली. ते खाली उतरले आणि
दोनशे वर्षांपूर्वी मराठी वीरांच्या रक्ताने भिजलेल्या पानिपतच्या रणभूमीवरच्या
त्या पवित्र मातीचा टिळा त्यांनी आपल्या मस्तकी लाविला ही एकच गोष्ट,
मराठी माणूस कोठेही असला तरी त्याच्या पूर्वजांचा इतिहास त्याच्या मनात किती
खोल भिनलेला आहे याची साक्ष देण्यास पुरेशी आहे आणि काकासाहेब गाडगीळ,
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि यशवंतराव चव्हाण हे तिघेही काँग्रेस पक्षाचे
धुरंधर कार्यकर्ते आहेत, हे प्रसिद्धच आहे. 'मुताटकीचा मांडव' या रमणीय
प्रवास वर्णनात मांडवगडाखाली लढणाऱ्या रणशूर बाजीराव पेशव्याचे ओजस्वी
शब्दचित्र रेखाटणारे आणि 'तुंग हिमालय तुमचा असुचा, केवळ माझा सह्यकडा'
हे महाराष्ट्र-भक्तीने ओथंबलेले रसभरित 'स्तोत्र' लिहिणारे वसंत बापट हे
समाजवादी आहेत. मराठी संतांच्या कार्याची मार्क्सवादी मीमांसा करणारे बा.
र. सुठणकर, आणि लालजी पेंडसे आणि 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या
राजवाड्यांच्या प्रक्षोभक प्रबंधाला लिहिलेल्या विवेचक प्रस्तावनेत राजवाड्यांचे
व मराठी इतिहासाचे सम्यक् मूल्यमापन करणारे श्रीपाद अमृत डांगे हे कम्युनिस्ट
आहेत. "महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे" असे महाराष्ट्राच्या इतिहासाचे

तात्पर्य सांगणारे आणि 'शिवछत्रपतींचा जयजयकार' करणारे सावरकर आणि 'मराठा' या नावानेच मुळी आपले वृत्तपत्र चालविणारे आचार्य अत्रे यांच्याबद्दल तर लिहिण्याचे कारणच नाही. त्याचप्रमाणे 'घृष्णेश्वर', 'कृष्णेची संस्मरणे', 'दक्षिण गंगा गोदावरी', 'पंढरी', 'महाराष्ट्राची दिल्ली' अशी सुंदर संस्मरणे लिहिणारे भरतभूमीचे चिरयात्री काकासाहेब कालेलकर हे गांधीवादी आहेत. इतकेच नव्हे तर यांपैकी कोणत्याही पक्षाची बांधिलकी न पत्करलेले सर्वतन्त्रस्वतंत्र डॉ. आंबेडकर यांनाही महाराष्ट्राच्या इतिहासाचा अतिशय अभिमान होता. या संदर्भात डॉ. ना. भा. खरे यांची आठवण उद्बोधक वाटण्यासारखी आहे.

"या भेटीत आमचे दोघांचे महाराष्ट्राचे प्रचलित राजकारण, महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि अस्पृश्य सोडून इतर बहुजन समाज यांचे गुणावगुण आणि शारी-रिक गुलामगिरी व मानसिक गुलामगिरी यांपैकी अधिक वाईट काय, इत्यादि विषयांबद्दल खूप दिलखुलास बोलणे होत असे. डॉ. आंबेडकरांशी झालेल्या संभाषणात मला हे दिसून आले की, त्यांना महाराष्ट्राचा आणि त्याच्या उज्ज्वल पराक्रमी इतिहासाचा फार अभिमान आहे."

मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान ही वस्तुस्थिति पक्षनिरपेक्ष आहे असा याचा अर्थ आहे. तो इतिहास ही साऱ्याच मराठी माणसांच्या वाट्याला आलेली वडिलोपार्जित धनदौलत आहे. शेजवलकरांनी एके ठिकाणी म्हटले आहे ते फार खरे आहे की, "मराठ्यांचा इतिहास हा सगळ्या मराठ्यांचा पैतृक वारसा आहे. यदुनाथ सरकार म्हणतात त्याप्रमाणे मराठे या एकाच गोष्टीमुळे सर्व हिंदुस्थानात इतर प्रांतांपेक्षा श्रेष्ठ आहेत. ती दौलत उधळून टाकण्याचा कोणत्याही मराठ्यांला अधिकार नाही." म्हणूनच मराठी माणसे निरनिराळ्या पक्षांत विखुरलेली असली तरी अखेर ती मराठीच माणसे असतात; कारण याच माणसांच्या पूर्वजांनी मराठ्यांचा इतिहास घडविलेला आहे. म्हणून पूर्वजांच्या इतिहासाने जोपासलेली मराठ्यांची अस्मिता कितीही नाही म्हटले तरी त्यांच्या मनावर प्रभुत्व गाजवीतच असते. म्हणूनच ज्याप्रमाणे इतिहासात पक्ष असले तरी इति-हासकाराला पक्ष नसतो, सारे पक्ष त्याला सारखेच असतात, त्याच न्यायाने साऱ्या पक्षांना इतिहासकार हा सारखा असावा अशी अपेक्षा जर केली तर ते योग्यच होईल. विश्वेची उपासना करणारे इतिहास हे झाले तरी एक ब्रह्मकर्मच आहे, आणि वैदिक ब्रह्मकर्माबद्दल जे विधान केलेले आहे, ते इतिहासाच्याही ब्रह्मकर्माबद्दल जसेच्या तसे वापरता येण्यासारखे आहे की, 'सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे!' (सर्वांच्या अविरोधाने मी आता ब्रह्मकर्माला प्रारंभ करतो.)

या संदर्भात टिळकांची एक आठवण सांगण्यासारखी आहे. प्रसिद्ध इतिहासकार पारसनीस यांचा व टिळकांचा घनिष्ठ संबंध होता. टिळकांच्या आग्रहावरून पारसनिसांनी झाशीच्या राणीचे चरित्र लिहिले व टिळकांनी त्याचे परीक्षण

करणारा अग्रलेखही 'केसरी'त लिहिला. पारसनिसांची इतिहासात गति पाहून न्यायमूर्ति रानडयांनी त्यांना आपणाला 'पेशवे दप्तरा'च्या कामात मदत करण्याची विनंती केली. तेव्हा पारसनिसांनी टिळकांचा सल्ला विचारला. टिळक हे राष्ट्रीय पक्षाचे अध्वर्यु आणि रानडे हे नेमस्तपक्षाचे अग्रणी. त्या दोन पक्षांत त्या काळात बिस्तव जात नसे. पण तो पक्षभेद मनातही न आणता टिळकांनी मोकळ्या मनाने पारसनिसांना सांगितले की – "रानडयांना मराठ्यांच्या इतिहासाची फार आवड आहे, पण कामामुळे त्यांना फुरसत होत नाही, तरी तुम्ही त्यांना अवश्य मदत करावी." त्याप्रमाणे पारसनीस हे आपले परमस्नेही कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांच्या 'आनंदाश्रमा'त राहू लागले व रानडयांकडे जाऊ लागले. हरिभाऊ हे नेमस्त पक्षाचे पुरस्कर्ते होते. पुढे एकदा असे झाले की पारसनिसांची व टिळकांची रस्त्यात गाठ पडली. नमस्कार चमत्कार झाले आणि टिळकांबरोबर असलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या एका गृहस्थाने पारसनिसांना टोमणा मारला की, "काय आनंदाश्रमात राहू लागल्यापासून प्रतिपक्षाला मिळालात वाटते?" पण या प्रश्नाचे उत्तर देण्याचे पारसनिसांना कारणच पडले नाही. प्रत्युत्पन्नमति टिळकांनी परस्पर त्या गृहस्थाला उत्तर दिले की– "अहो, इतिहासास पक्ष नाही. सत्य हाच त्याचा पक्ष!"

टिळकांच्या या उद्गारावर भाष्य करण्याची जरूर आहेच काय?

हिंदुस्थानचा इतिहास लिहावा असा टिळकांचा मनोदय होता. बाबासाहेब खापर्डे यांच्याशी बोलताना ते एकदा म्हणाले–" मी (हिंदुस्थानचा इतिहास) लिहिणार आहे. त्याचे सुमारे चौदा खंड होतील." त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्याचा त्यांचा संकल्प होता. मंडालेच्या तुरुंगात लिहावयाच्या संकल्पित ग्रंथांच्या यादीत 'Life of Shivaji' या ग्रंथाचे नाव आहे. हा 'हिंदुस्थानचा इतिहास' व 'शिव–चरित्र' टिळकांच्या हातून लिहिले गेले नाही हे उघडच आहे. त्यांच्या अनेक संकल्पाप्रमाणे हेही संकल्प अखेर अपुरेच राहिले.

पण त्यांनी ते ग्रंथ लिहिले असते तर कोणत्या पद्धतीने लिहिले असते, याबद्दल त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथावरून अनुमान करण्यास जागा आहे. त्यांचा 'गीता–रहस्य' हा ग्रंथ शुद्ध शास्त्रीय पद्धतीने सत्यान्वेषण करणारा ग्रंथ आहे. 'गीता–रहस्या'च्या प्रस्तावनेत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे की– "सर्व टीका आणि भाष्ये बाजूला ठेवून नुसत्या गीतेचीच आम्हां स्वतंत्र विचारपूर्वक अनेक पारायणे केली तेव्हा टीकाकारांच्या छापेतून सुटका होऊन मूळ गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे–असा बोध झाला. आमचा काही विशिष्ट संप्रदाय असून तत्सिद्धयर्थ आम्ही गीतेचा एक प्रकारचा विशिष्ट अर्थ करतो अशी कित्येकांची समजूत होण्याचा संभव आहे. यासाठी येथे येवढे सांगितले पाहिजे की, गीता रहस्य हा ग्रंथ कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस किंवा संप्रदायास

बद्दलून लिहिलेला नाही. आमच्या बुद्धीप्रमाणे गीतेच्या संस्कृत श्लोकांचा जो सरळ अर्थ होतो तो आम्ही दिला आहे. असा सरळ अर्थ केल्याने त्यात जर काही सांप्रदायिकपणा येईल तर तो गीतेचा आहे, आमचा नव्हे."

'Orion' या ग्रंथात टिळकांनी वेदाचा काल-निर्णय केलेला आहे. आता वेदांचा काल-निर्णय करायचा म्हणजे कालाने बद्ध असलेल्या मनुष्यांनी निर्माण केलेले 'पौरुषेय वाङ्मय' म्हणूनच वेदांकडे, पाहणे भाग होते. टिळकांची ही दृष्टि, 'अस्य वा महतो भूतस्य निःश्वसितमेतद् यद् ऋग्वेदः।' अशा प्रकारे वेदांना अपौरुषेय वाङ्मय मानणाऱ्या बहुसंख्य लोकांना रुचणे शक्यच नव्हते. इतकेच नव्हे, तर प्रो. जिनसीवाल्यांसारखे वेदांना अपौरुषेय वाङ्मय मानणारे टिळकांचे परममित्र सुद्धा त्यांच्या या वृत्तीमुळे त्यांच्यावर फार रुष्ट झाले. पण त्याला टिळकांचा इलाज काहीच नव्हता. लौकिक दृष्टयाच पाहावयाचे झाले, तर 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हे हिंदुधर्माचे एक स्वरूपलक्षण मानण्याइतकी पूज्यबुद्धि वेदांबद्दल त्यांना होती. परंतु लौकिक दृष्टि निराळी व शास्त्रीय दृष्टि निराळी. कारण त्या शास्त्रीय चिकित्सेत वेदांचा काल-निर्णय करताना त्यांचे अपौरुषयत्व डळेल या भीतीला थारा देता कामा नये असे त्यांचे मत होते. कारण सर्व शास्त्रीय संशोधनाचे उद्दिष्ट केवळ सत्यशोधन हेच आहे असा त्यांचा आग्रह होता.

Fears like these are out of place in a historical and scientific inquiry, the sole object of which is to search for and to find out the truth.

अशा प्रकारे ओरायन आणि 'गीतारहस्य' या ग्रंथावरून अनुमान करता येते की, मराठ्यांच्या इतिहासावर टिळकांनी जर काही लिहिले असते तर तेही अशाच प्रकारे पूर्वग्रहांना रजा देऊन, वस्तुनिष्ठ दृष्टीने, सत्यशोधन करण्याच्या उद्देशानेच लिहिले असते.

पण दुर्दैवाची गोष्ट आहे की या बाबतीत टिळकांनी अनुमान प्रमाणावर भिस्त ठेवण्याची आपणास जरूरीच ठेवली नाही. मराठ्यांच्या इतिहासावर त्यांचे लेख थोडेच आहेत पण जे आहेत ते वशिष्टयपूर्ण आहेत. शिवछत्रपतीवरील त्यांच्या दोन लेखांत—विशेषतः 'थोर पुरुषांची चरित्रे' या लेखात शिवाजी-महाराजांच्या विभूतिमत्त्वाची त्यांनी "यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छत्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥" या गीता वचनाधारे अतिशय शास्त्रीय मीमांसा केलेली आहे व शिवाजीवर असलेल्या 'ईश्वरी कृपे'ची कल्पना बुद्धि-वादाच्या कसोटीला लावून पाहिलेली आहे. त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्यांच्या 'श्रीशिवाजी महाराजांची जन्मतिथि' हा लेख होय. या लेखात ज्योतिर्गणि-ताच्या साहाय्याने शिवजन्मतिथीचा निर्णय करणाऱ्या टिळकांच्या संशोधकबुद्धीचा

प्रकर्ष प्रत्ययाला येतो. हे तर झालेच. पण यातला खरा मुद्दा पुढेच आहे. या लेखानंतर पंधरा वर्षांनी टिळकांना 'जेधे शकावली' उपलब्ध झाली. त्यात शिवजन्मतिथि टिळकांनी ठरविलेल्या तिथीच्या अगदी विरुद्ध दाखविली होती. टिळकांनी निर्णय केलेली तिथि होती वैशाख शु॥ १ गुरुवार शके १५४९ (६ एप्रिल १६२७) आणि 'जेधे शकावली'तली तिथि होती- फाल्गुन व॥ ३ शके १५५१ शुक्रवार (१९ फेब्रुवारी १६३०)

पण सत्यसंशोधनाचे व्रत घेतलेल्या टिळकांनी आपल्या तिथीबद्दल कसलाही आग्रह न धरता इतकेच म्हटले की– "ही बाब खरोखर चमत्कारिक आहे. सुमारे सोळा वर्षांपूर्वी छत्रपतींची जन्मतिथि शके १५४९ वैशाख शु॥ १ असल्याबद्दल मी ठरविले होते. प्रसिद्ध व अप्रसिद्ध बखरींत या जन्मतिथीबद्दल अत्यंत विसंगतता आहे. सबब या बाबीचा जितका जास्त खल होईल तितका पाहिजेच आहे."

बुद्धीचे फल कोणत्याही गोष्टीचा आग्रह किंवा अभिनिवेश न धरणे हे सांगितलेले आहे– 'बुद्धेः फलमनाग्रहः।' टिळकांचे वरील उद्गार, हे त्या वचनाचा वस्तुपाठ म्हणण्यास हरकत नाही.

टिळकांचे उदाहरण आपण व्यक्ति म्हणून घेतलेले नाही. तर वस्तुनिष्ठ दृष्टीचे उपलक्षण म्हणून घेतलेले आहे. टिळकांच्या या उदाहरणातून कोणता बोध निष्पन्न होतो बरे? हाच की, ज्याप्रमाणे देवाच्या दर्शनाला जाताना आपण पादत्राणे मंदिराच्या बाहेर काढून ठेवतो त्याप्रमाणे इतिहास देवतेच्या दर्शनाला जाताना आपल्या पूर्वग्रहांची पादत्राणे बाहेर काढून ठेवली तरच ती देवता जिचे एक स्वरूप आहे, त्या सरस्वतीचा वर प्रसाद होण्याची आशा आहे. नाही तर नाही. इतिहासातले हेच 'आर्य सत्य' गिबनने ऐतिहासिक दृष्टीचे विवेचन करताना निराळ्या शब्दांत सांगितले आहे की–

The historical temper which obeys utmost Evangelical maxim of forgetting friends, country, religion, of giving merit its due place and embracing truth wherever it is to be found.

(एव्हॅंजेलिकल धर्मपंथाची जी धर्माज्ञा तीच जवळ जवळ ऐतिहासिक दृष्टिचीही आहे.– की मित्र, देश, धर्म हे विसरावे, गुणांचा योग्य गौरव करणे आणि सत्य जेथे जेथे असेल तेथे तेथे त्याचा स्वीकार करण.)

'यथा नद्यः स्यन्दमाना समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय ।

एवं विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥'

असे जे उपनिषदात म्हटले आहे त्याचा अर्थ असा की, आपले नामरूप सोडून नद्या ज्याप्रमाणे समुद्रात विलीन होतात त्याप्रमाणे नामरूपापासून विमुक्त झालेला ज्ञानी पुरुष परात्पर पुरुषात विलीन होतो. उपनिषदातले हे वर्णन

शब्दब्रह्माचे स्वरूप असलेल्या इतिहासाची उपासना करणाऱ्या इतिहासकारकालाही तितकेच लागू करता येण्यासारखे आहे. जेव्हा आपले वैयक्तिक व्यक्तिमत्त्व इतिहासकार इतिहासात विलीन करतो तेव्हाच इतिहासकार म्हणून तो अमर होऊ शकतो. उदाहरणार्थ, मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करताना प्रारंभापासून अखेरपर्यंत जर कोणत्या एका विचाराचा धागा अखंड आढळत असेल तर तो 'हिंदवी स्वराज्या'चा आणि 'हिंदुधर्मरक्षणा'चा होय. आजच्या अर्थाने 'हिंदुत्ववाद' किंवा 'राष्ट्रवाद' मराठ्यांना माहीत होता असे अर्थातच म्हणणे कठीण आहे, पण म्हणून त्यांच्या मनात 'हिंदवी स्वराज्या'च्या किंवा 'हिंदुधर्मरक्षणा'च्या कल्पनाच नव्हत्या असेही म्हणता येणार नाही. आता एखादा इतिहासकार मराठ्यांच्या या विचारांशी व प्रेरणांशी सहमत असेल किंवा नसेल, पण मराठ्यांचे हे विचार व ह्या प्रेरणा जास्तीत जास्त प्रामाणिकपणाने व्यक्त करणे हे इतिहासकार म्हणून त्याचे कर्तव्य आहे. इतिहासातल्या व्यक्तींवर आपल्या विचारांचा आरोप इतिहासकाराने करणे जितके अन्यायाचे आहे, तितकेच इतिहासातल्या व्यक्तींच्या विचारांचा आरोप इतिहासकारावर करणेही अन्यायाचे आहे. म्हणूनच तादात्म्याप्रमाणेच तटस्थताही इतिहासाला आवश्यक आहे. इतिहासातली वस्तुनिष्ठ दृष्टि ती हीच होय, की जेव्हा व्यक्ति म्हणून त्याचे अस्तित्व संपते आणि केवळ इतिहासकार म्हणूनच, तो शिल्लक राहतो. इतक्या निर्लेप आणि निरंजन वृत्तीने इतिहास लिहिणे, तसे पाहिले तर दुर्घटच आहे. पण प्रयत्नांची दिशा तरी तशी असावी असे वाटते. गिबनला ही वस्तुनिष्ठ दृष्टि बऱ्याच प्रमाणात साध्य झाली होती असे वाटते. गिबन हा मोठा विद्वान् होता किंवा मोठा कलावंत होता म्हणून तो मोठा इतिहासकार झाला असे नाही. ते तर तो होताच. पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे आपणापेक्षा आपला इतिहास त्याने सदैव मोठा मानला. इतिहासाच्या ऐरावतापुढे आपली षामभट्टाची तट्टाणी दामटण्याचा केविलवाणा उपद्व्याप त्याने केला नाही. त्यामुळे व्यक्ति म्हणून गिबन संपला असला तरी इतिहासकार म्हणून अद्याप अमरच आहे. गिबनच्या अमरत्वाचे रहस्य हे असे आहे. या संदर्भात जे. कॉटर मॉरिसनने व्यक्त केलेले विचार नेहमीच मार्गदर्शक होण्यासारखे आहेत–

If the decline and fall has no superior in historical literature it is not solely the consequence of Gibbon's profound learning, wide survey and masterly grasp of his subject. With wise descretion he subordinated himself to his task.

'युद्धस्य कथा रम्या ।' असे प्रसिद्ध वचन आहे. इतिहास ही बऱ्याच प्रमाणात युद्धाचीच कथा असते, आणि त्यामुळेच तो रम्य असतो. पण त्याच्या बरेच पुढे जाऊन युद्धशास्त्राच्या दृष्टीने युद्धाची आणि युद्धपद्धतीची चिकित्सा करण्याचा एक प्रकार आहे. मराठीत या पद्धतीच्या इतिहासाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे

कॅ. मोडक यांचे 'प्रतापगडचे युद्ध' हे पुस्तक होय. या 'उत्तरार्धा'त 'मराठ्यांची युद्धनीति' म्हणून जे प्रकरण आहे, ते अशाच प्रकारचे आहे. अर्थात् मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे युद्धशास्त्राच्या दृष्टीने विवेचन करण्याची कल्पना माझी नसून येथे स्थायिक झालेले निवृत्त मेजर जनरल श्री. अ. वि. नातू यांची आहे, हे कटाक्षाने सांगणे आवश्यक आहे. त्यांनी 'पूर्वार्धा'तही ही उणीव माझ्या नजरेस आणून दिली इतकेच नव्हे, तर ते न्यून पुरते करण्यासाठी आपल्या जवळची 'El Amien' 'The Matter of Honour, 'Panzer Division' इत्यादि दुर्मिळ पुस्तकेही पुरविली. त्या सर्वच पुस्तकांचा जितक्या तपशिलाने परामर्श घ्यायला हवा होता, तितका स्थलमर्यादेमुळे मला घेता आला नाही हे खरे आहे; पण म्हणून श्री. नातूंच्या कल्पनेचे आणि मदतीचे मूल्य कमी होत नाही. इतकेच नव्हे, तर 'मराठ्यांची युद्धनीति' या प्रकरणामुळे ह्या 'उत्तरार्धा'चे ऐतिहासिक मूल्य काही वाढले असेल, तर त्याचे श्रेय सर्वस्वी श्री. नातूंचे आहे, हे मान्य करण्यास मला मोठा आनंद वाटतो.

ह्या प्रकरणासाठी मी प्रामुख्याने 'महाराष्ट्र-धर्म'– (भा. वि. भट), 'राजपूत संस्कृति'– (ह. वा. देशपांडे), 'प्राचीन अर्वाचीन युद्धपद्धति' (मा. कृ. शिंदे), 'चक्रवर्ति नेपोलियन' (वि. ल. भावे) या पुस्तकांचा उपयोग केलेला आहे. त्याचप्रमाणे राजारामाच्या अखेरच्या प्रकरणात राजारामाने प्रतापगडच्या भवानीला केलेल्या नवसाचा निर्देश आलेला आहे. तो मला 'द. वा. पोतदार स्मारक ग्रंथा'तील शां. वि. आवळसकर यांच्या 'प्रतापगडची भवानी' या लेखात मिळाला. त्याचप्रमाणे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अहि-नकुल' या कवितेची 'पूर्वार्धा'त दोन व या 'उत्तरार्धा'त तीन अशी एकंदर पाच कडवी मी वापरली आहेत, तसेच 'पूर्वार्धा'साठी वापरलेले सर्व ग्रंथ या 'उत्तरार्धा'साठीही वापरलेले आहेत; कारण भाग दोन असले तरी ग्रंथ एकच आहे.

या सर्व ग्रंथकारांचा मी शतशः ऋणी आहे, हे सांगणे नकोच.

पण, ग्रंथ जरी असले, तरी ते उपलब्ध नसले तर ते असूनही नसल्यासारखेच असतात. म्हणून ज्या संस्थांनी आणि व्यक्तींनी मला हे ग्रंथ उपलब्ध करून दिले, त्यांचे आभार मानणे हे क्रमप्राप्त कर्तव्य आहे. त्या संदर्भात, चाळीसगाव येथील 'कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,' 'आनंदीबाई बंकट हायस्कूल' आणि 'नारायण बंकट नगर वाचनालय' या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे आणि सेवक वर्गाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच 'पोतदार स्मारक ग्रंथा'चा संदर्भ मला शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितला. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. तो ग्रंथ मला धुळ्याचे एस्. एस्. व्ही. पी. कॉलेजातील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. चं. र. देशपांडे यांनी उपलब्ध करून दिला त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. वास्तविक प्रा. देशपांडे यांचा व माझा स्नेहसंबंध इतका

जुना आहे की केवळ शब्दांनी मानले म्हणून त्यांचे मित्रऋण फिटणारे नाही याची मला उत्तम जाणीव आहे. पण 'प्राप्तानृण्या याति बुद्धिः प्रसादम्' या न्यायाने ऋणनिर्देश केला म्हणजे मनाला समाधान वाटते, म्हणून शब्दांनी ते व्यक्त करायचे इतकेच. काही ऋणे कधीही फिटणारी नसतात आणि तोच त्यांचा गौरव असतो. त्या ऋणांपैकीच हे 'मित्रऋण' म्हणावयाचे, त्याचप्रमाणे पूर्वार्धातला येसूबाईचा तुलनेने असलेला अनुल्लेख माझ्या नजरेस आणून दिल्याबद्दल नासिकचे श्री. विपिन पुराणिक व शिरूरचे प्रा. सु. ह. जोशी यांचाही मी फार आभारी आहे.

या ग्रंथातील दोन ऐतिहासिक उल्लेखांबद्दल खुलासा करणे जरूर आहे. पहिला उल्लेख ग्रंथाच्या शीर्षकाबद्दल. या ग्रंथात अनेक ठिकाणी, राजारामाने शाहूचा विश्वस्त म्हणून कारभार केला, स्वतः राजपद धारण केले नाही, अशी विधाने आहेत आणि ग्रंथाचे शीर्षक तर 'छत्रपति राजाराम' असे आहे, हे कसे? तर या शंकेचा परिहार असा आहे की, राजारामाने 'तुम्ही राजचिन्हे धारण करून पूर्ववत् व्यवहार करावेत' या येसूबाईच्या सूचनेला अनुसरून 'छत्रपतिपद' धारण केले हे खरे, पण ते केवळ राज्य चालविण्याचा उपचार म्हणून; राज्यलोभाच्या वासनेने नव्हे. कारण छत्रपति म्हणून शंकराजी नारायणाला काढलेल्या आज्ञापत्रातही तो स्वतःला शाहूचा विश्वस्त म्हणूनच मानताना दिसतो. 'राज्य-उपभोग म्हणजे राजसंन्यास' हे गडकऱ्यांचे वचन राजारामाला उत्तम शोभून दिसते. पण राजसंन्यास जरी असला तरी उपचारार्थ कां होईना त्याने राजपद स्वीकारले होते म्हणून त्याला 'छत्रपति' असेच संबोधणे योग्य आहे. राजवाड्यांच्या पंधराव्या खंडात राजारामाने 'छत्रपति' या नावाने काढलेली अनेक आज्ञापत्रे छापलेली आहेत, ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. उदाहरणार्थ-

(१) "१६१६ चैत्र शु. ॥ ३ स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० भाव संवत्सरे चैत्र शुध तृतीया रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणी समस्त राज्यकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रपंत अमात्य हुकमतपन्हा यांसि आज्ञा केली ऐसी जे-"

(२) "स्वस्ति श्री राजशके २३ धातुनाम संवत्सरे श्रावण शुध चतुर्दशी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि रा. रा. शंकराजीपंडित सचिव मदालसमहाम यांसी आज्ञा केली ऐसी जे-" इत्यादि.

दुसरा ऐतिहासिक उल्लेख म्हणजे संताजी घोरपड्याच्या स्मारकाबद्दलचा होय. त्या संदर्भात या ग्रंथात विधान केले आहे की, संताजीचा शिरच्छेद झाला त्या ठिकाणी कोणतेही स्मारक नाही. गेल्या तीनशे वर्षांचा इतिहास या दृष्टीने हे विधान चूक आहे असे नाही. परंतु, सातारा जिल्हा परिषदेने संताजीचे स्मारक

करण्याचा निर्णय अलीकडे घेतलेला आहे. त्या संदर्भात माझे विधान केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच वाचावे अशी विनंती आहे. ते स्मारक जेव्हा होईल, तेव्हा अर्थातच माझी विधाने इतिहासजमा होतील. त्यात मला आनंदच आहे. नव्या इतिहासाने जुन्या इतिहासातली उपेक्षा इतिहासजमा करून टाकावी, यापेक्षा मराठी माणसाला आनंद देणारी दुसरी गोष्ट कोणती आहे? सातारा जिल्हा परिषदेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन करावे तेवढे थोडेच होय.

ग्रंथ ही ग्रंथकाराची अपत्ये असतात असे म्हणतात ते खरे आहे, कारण, प्रपंचातल्या 'त्या' अपत्यांप्रमाणे लेखकाच्या प्रपंचातील 'ही' अपत्येसुद्धा हरवतात, बुडतात, आगीत सापडतात, जिवावरच्या संकटांत पडतात, प्रसंगी अजिबात 'दगावतात' सुद्धा. भास कवीला आपली सारी नाटके अग्नीत टाकावी लागली, आणि अनेक मुलांपैकी एक मुलगा तेवढा जगूनवाचून हाती लागावा, त्याप्रमाणे त्याच्या विपुल नाट्यसंततीपैकी, 'स्वप्नवासवदत्तम्' हे एकच नाटक त्या अग्नि-दिव्यांतून त्याचे नाव सांगायला जगात राहिले. विपादाच्या भरात गुणाढ्याने आपल्या 'बृहत्कथे'च्या सात लक्ष ग्रंथांपैकी सहा लक्ष ग्रंथ अग्निनारायणाला समर्पण केला व फक्त एक लक्ष ग्रंथ शिल्लक राहिला. बाणभट्टाची 'कादंबरी' 'अर्धवट'च राहिली, ती त्याचा मुलगा भूषणभट्ट याने पुरी केली व 'अव्यंग' केली, आणि कुलभूषण होऊन आपले नाव सार्थ केले. 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे यांना आपले 'काळातले निवडक निबंध' जाळून टाकावे लागले. सावरकरांचा 'शिखांचा इतिहास' ब्रिटिश हेरांच्या हाती लागला तो गेलाच, पुन्हा काही त्याला आपल्या जन्मदात्याचे दर्शन झाले नाही. कार्लाईलच्या 'फ्रेंच राज्यक्रांती'च्या पूर्वार्धाचे हस्तलिखित त्याचा परम मित्र मिल याच्या मोलकरणीने कचऱ्या-बरोबर जाळून टाकला. फडके यांच्या 'अंजली' या कादंबरीचे हस्तलिखित प्रवासात चोरीला गेले, शोध केला तेव्हा त्याची पाने रेल्वेमार्गाच्या कडेला वाऱ्यावर फडफडताना आढळली.

ही अशी उदाहरणे पाहिली म्हणजे असे वाटते की, लेखक ग्रंथ लिहितो आणि आणि वाचक तो वाचतो. पण, लेखकाच्या हातातून वाचकाच्या हातापर्यंत त्या ग्रंथांचा जो 'प्रवास' होतो, त्यात किती 'पण' आणि 'परंतु' असतात यांची कल्पना 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे!' इतरांस तो येणे दुर्घट आहे. मुलगा लहान असतो, तो बापाच्या डोक्याइतका उंच होतो आणि त्यालाच युक्तीच्या चार गोष्टी सांगू लागतो. त्या वेळी या अवस्थेला येईपर्यंत किती जिवावरच्या संकटातून ते पोरटे वाचावले याची कल्पना पोराला नसली तरी बापाला चांगली असते, तसेच हे म्हणावयाचे.

या ग्रंथाच्या बाबतीतही असाच काहीसा प्रकार झाला. तो सांगण्यासारखा आहे.

गिरजोजी यादवाने राजारामाच्या जवाहिराची 'उंच उंच गाठोडी' बांधून आपल्या बरोबर घेतली होती असे या ग्रंथात वर्णन आहे. या ग्रंथाच्या हस्तलिखिताचीही अशीच उंच उंच चार गाठोडी बांधून पुण्याला येताना आम्ही आमच्याबरोबर घेतली होती. आमची गाडी पुण्याला रात्री एक वाजता आली. 'नाना भाऊंचे पुणे, तेथे काय उणे' या पुणे वर्णनाप्रमाणे पुण्याच्या स्टेशनावर इतर गोष्टींप्रमाणे गर्दीला अर्थात् उणे नव्हतेच. आधीच उल्हास होता आणि त्याला पुन्हा तो खरोखर फाल्गुन मासच होता. मग काय विचारायचे आहे ! डब्याच्या दारात चढणारे प्रवासी आणि उतरणारे उतारू यांची एकच घुमश्चक्री माजली. अशा स्थितीत 'तुम्ही आधी उतरून घ्या, गाठोडी आम्ही देतो' असे सहप्रवाशांनी सांगितले आणि दुसरा पर्यायही काही नव्हताच. त्यामुळे 'आत्मानं सततं रक्षेत्' या मनुवचनाचा आदर करून आम्ही तेवढे गाडीतून कसे बसे उतरलो. गाठोडी गाडीतच राहिली. आमच्या सहप्रवाशांनी ती आमच्यापर्यंत पोचविण्याची पराकाष्ठा केली, पण त्यांचे हात काही आमच्यापर्यंत पोचेनात. गाठोडी आता खरे म्हणजे गेल्यातच जमा होती.

अशा परिस्थितीत एक व्यक्ति तीरासारखी त्या गर्दीत घुसली आणि वाघिणीच्या जबडयातून एखाद्या वीरमातेने आपली मुले ओढून काढावीत, त्याप्रमाणे धडकावर धडका देणाऱ्या गर्दीच्या त्या महापुरातून तिने शर्थीने ती गाठोडी एकामागून एक दरदरा ओढीत आणिली आणि फलाटावर आदळली. ती गाठोडी म्हणजे हा ग्रंथ होय. ती व्यक्ति जर त्या वेळी तेथे नसती तर प्रसिद्ध होण्यापूर्वीच या ग्रंथाची इतिश्री झाली असती.

वाईट वाटते ते इतकेच की इतक्या लोकांचा मी नामोल्लेखपूर्वक ऋणनिर्देश केला व ते योग्यही होते. पण 'माझे असतेपण लोपो। नामरूप हारपो।' अशी जगावेगळी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या या 'अनामिक' व्यक्तीच्या बाबतीत मला तसे करता येत नाही. पण एवढे म्हटल्यावाचून मात्र राहवत नाही की, या ग्रंथाचे 'पूर्वार्ध' आणि 'उत्तरार्ध' हे दोन्ही खंड त्या व्यक्तीच्या निरुपम धैर्याचे आणि स्वार्थत्यागाचे मूर्तिमंत स्मारक आहे. कर्माच्या रूपाने कर्ता राहतो तो असा.

त्या 'अनामिके'चे अनंत आभार !

जोशी बिल्डिंग, हनुमानवाडी
चाळिसगाव

लक्ष्मीनारायण

# अनुक्रमणिका

## छत्रपति राजाराम

१. १-१०

रायगडला झुल्फिकारखानाचा वेढा-येसूबाईची मसलत-राजारामाचा प्रवास-रायगड ते जिंजी-राजाराम जिंजीस पोचतो.

२. ११-२५

रायगडावर येसूबाई-रायगडचा वेढा-येसूबाईची बिकट परिस्थिति-येसूबाईची शरणागति-औरंगजेबापुढे.

३. २६-३९

मराठ्यांचा प्रतिकार-मुसलमानांची पिछेहाट-रामचंद्रपंताचे वतन वृत्तीस आवाहन-काळजास हात घातला-भ्रमनिरास- "गनीमसा तुम्ही लोकी केला आहे"-मराठ्यांचे मनोरथ-राजारामाचे स्वप्न.

४. ४०-५८

झुल्फिकारखानाचा जिंजीस वेढा-मराठ्यांचे हल्ले-झुल्फिकारखानाची बिकट परिस्थिति-औरंगजेब कामबख्श व आसदखान यांस रवाना करितो-धनाजी-मोगलांची अतर्गत यादवी-संताजी-झुल्फिकारखानाची तात्पुरती युद्धतहकुबी-औरंगजेबाची प्रतिक्रिया.

५. ५९-९२

गलगलीस औरंगजेब-छावणी-प्रशासक औरंगजेब-कारभाराचा व्याप-बारकावा-धर्मदृष्टि-पन्हाळा मराठे घेतात-आणि सिंहगड-संताजीचा कासीमखान व हिंमतखानावर विजय.

६. ९३-११२

संताजी घोरपडे-एकांडा शिलेदार-कोणाशीच पटेना!-आयेवार-कुटीची लढाई-कारखळा-खून-मूल्यमापन.

७. ११३-१३१

जिंजीला झुल्फिकारखानाचा वेढा-राजारामाची बिकट परिस्थिति-खंडो बल्लाळाची स्वामिनिष्ठा-जिंजीहून सुटका-झुल्फिकारखान जिंजी घेतो-जिंजी व वेलोर-राजाराम महाराष्ट्रात येतो.

८. १३२-१५७

दहा वर्षांचो फलश्रुति-स्वराज्य राखले-तत्त्व गमावले-वतनवेड बोकाळले-मोठेही सुटले नाहीत-तरीही राज्य राखले ही मोठी गोष्ट-मराठ्यांचा धुमाकूळ-औरंगजेब किल्ले घेण्यासाठी बेगमपुर सोडतो.

९. १५८-१८३

औरंगजेबाची मोहीम-वसंतगड-सातारचा वेढा-राजारामाचा मृत्यु राजारामाचे मूल्यमापन.

## ताराबाई

१०. १८७-१९६

सातारचा वेढा पुढे चालू-मराठ्यांनी किल्ला दिला-परळीचा वेढा-खवासपूर-औरंगजेबाला अपघात.

११. १९७-२१०

औरंगजेब पन्हाळ्याला वेढा घालतो—मराठे प्रतिकार करितात—मोगलांची आपापसांतली भांडणे-पन्हाळा काबीज.

१२. २११-२२७

विशाळगड—स्वारीतल्या अडचणी—फतेउल्लाखान—विशाळगड काबीज-औरंगजेबाचा परतीचा प्रवास.

१३. २२८–२४३

सिंहगड – राजगड — तोरणा — शाहू – औरंगजेब संबंध – औरंगजेब वाकिणखेडयाकडे.

१४. २४४–२५८

औरंगजेब–दुर्गयात्रेची फलश्रुति–मराठ्यांच्या महाराष्ट्राबाहेर स्वाऱ्या–गुजरात, माळवा–कर्नाटक–किल्ले घेण्यातली शोकांतिका–कारण-औरंगजेबाला मराठे समजले न हीत.

१५. २५९–२७१

धनाजी जाधव–गनिमी कावा–गुजरायवर स्वारी–वैयक्तिक गुण-दोष - दोषांपेक्षा गुण मोठे–मूल्यमापन

१६. २७२–३०३

ताराबाई–औरंगजेबाचा प्रतिकार–उत्तरेकडे मराठ्यांचे तोंड फिरविले–शत्रूंचे मूल्यमापन–स्वकीयांशी संघर्ष-करडे शासन–वैगुण्य–शाहूशी संघर्ष–ताराबाई आणि राजाराम–येसूबाई–येसूबाई व ताराबाई

१७. ३०४–३३०

मराठ्यांची युद्धनीति–संभाजी–राजाराम कारकीर्द–संताजी घोरपडे –ताराबाई–किल्ले–मराठ्यांचा गनिमी कावा–भूरचना–स्वभाव रचना–महाभारत काळाइतके जुने तंत्र–शिवाजीने मंत्र दिला–लोकयुद्ध, मोगल व मराठे–तुलना–इतर देशांची स्वातंत्र्ययुद्धे– ले. क. दीक्षित यांचे विवेचन–नेपोलियन व औरंगजेब.

१८. ३३१–३५७

वाकिणखेडा–पिडनायक–औरंगजेब वेढा घालतो–मराठ्यांची कुमक आली–पिडनायकाचे बादशहास पत्र–बादशहाची फजिती–झुल्फिकारखान येतो–वाकिणखेडा काबीज–दिवापूरला मुक्काम–बहादुरगडाकडे–अहमदनगर–अखेरचा प्रवास.

१९. ३५८–३८३

औरंगजेबाचे अखेरचे दिवस–औरंगजेबाचा मृत्यु

२०. ३८४–४०२

खुल्दाबाद

□ □

(उत्तरार्ध)

# छत्रपति राजाराम

(१६८९-१७०७)

'रण काय भयानक, लोळे आग जळांत
आदळती वळती आवळती त्वेषांत !
जणु जिंकायासी गगनाचे स्वामित्व,
आषाढ-घनांशी झुंजे वादळवात !

-कुसुमाग्रज
(अहि-नकुल)